महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID :ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र. : तंशिविकापु/विवि-५/क्रीडास्पर्धा/२०२३/ 170

**महत्वाचे /तात्काळ**

दिनांक : 09 JAN 2023

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य, या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय संस्था /
उपसचिव (म.रा.तं.शि.मं.वि.का.पुणे)

**विषय : पुणे विभागांतर्गत क्रीडास्पर्धांचे (खेळांचे) आयोजनाबाबत..**

संदर्भ : १. तंशिविकापु/विवि-५/क्रीडास्पर्धा/२०२२/४१४० दिनांक ३०.०८.२०२२
२. तंशिविकापु/विवि-५/क्रीडास्पर्धा/२०२२/५४३३ दिनांक २२.११.२०२२
३. शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय कराड या संस्थेचे पत्र जा.क्र.शाअमक/आस्था/स्पर्धा/२०२२/४८९३ दिनांक ०७.१२.२०२२.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भ क्र.०२चे परिपत्रकान्वये पुणे विभागांतर्गत क्रीडा स्पर्धांचे आयोजन जानेवारी२०२३ मध्ये करण्यात येणार असल्याबाबत कळविण्यात आलेले होते, त्याअनुषंगाने या विभागीय कार्यालय अंतर्गत असणाऱ्या सर्व शासकीय संस्था/कार्यालयामधील अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना रोजच्या कामाच्या ताण तणावामधून मुक्ती मिळावी, शारिरीक व मानसिक तंदुरुस्ती वाढावी तसेच त्यांच्यामध्ये संघभावना वृध्दीगंत व्हावी या हेतूने मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या संकल्पनेतून व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे अंतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय संस्थांतील/कार्यालयातील अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचेकरीता खाली नमूद केल्याप्रमाणे **कराड येथील ०३ शासकीय संस्थांमध्ये सोमवार दिनांक १६.०१.२०२३ रोजी क्रीडास्पर्धा आयोजित करण्यात येत आहेत.**

क्रीडास्पर्धा कार्यक्रमाचे स्वरुप, तसेच सांघिक व वैयक्तिक खेळांचा समावेश व क्रीडास्पर्धे बाबतची नियमावली तयार करण्यात आलेली असून, खालीलप्रमाणेआहे.

**क्रीडास्पर्धेबाबत नियमावली :-**

१) क्रीडा महोत्सवात क्रिकेट, व्हॉलीबॉल, टेबल टेनिस, कॅरम, बुध्दीबळ, बॅडमिंटन,रनिंग हे क्रीडाप्रकार आहेत.

२) सदर स्पर्धा ही केवळ शासकीय सेवेतील कार्यरत कर्मचाऱ्यांकरीता असून, प्रत्येक खेळाडूकडे संबंधित संस्थेचे ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

३) स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या स्पर्धकांची माहिती सोबत दिलेल्या गुगल फार्म मध्ये खालील दिलेल्या नमुन्यामध्ये सर्व माहिती भरुन संस्थाप्रमूखाच्या **मान्यतेसह बुधवार दि.११.०१.२०२३ रोजीपर्यंत या गुगलफॉर्ममध्ये** https://forms.gle/PYvBAiBZdZXVND1h8 **भरुन पाठविण्यात यावी.** यानंतर आलेली माहिती/नावे ग्राह्य धरली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

४) संस्थानिहाय प्रत्येक खेळासाठी सहभागी खेळाडूंच्या संख्येची कमाल मर्यादा पुढीलप्रमाणे आहे. संस्थांनी संबंधित खेळासाठी स्पर्धा समितीने विहीत केलेल्या खेळाडूंच्या संख्येच्या मर्यादेमध्ये नावे पाठवावी.

**(कृ.मा.प.)**

| अ.क्र. | खेळाचे नांव/प्रकार | खेळाडूंची कमाल मर्यादा |
|---|---|---|
| १. | क्रिकेट | १५ खेळाडू(एक संघ) |
| २. | व्हॉली बॉल | १०खेळाडू (एक संघ) |
| ३. | टेबल टेनिस | ०४ खेळाडू (प्राधान्याने ०२ महिला खेळाडू) |
| ४. | कॅरम | ०४ खेळाडू (प्राधान्याने ०२ महिला खेळाडू) |
| ५. | बुध्दीबळ | ०४ खेळाडू (प्राधान्याने ०२ महिला खेळाडू) |
| ६ | बॅडमिंटन | ०४ खेळाडू (प्राधान्याने ०२ महिला खेळाडू) |
| ७. | रनिंग १०० मीटर- खुला गट | १०० मीटर- ०४ खेळाडू |
| | | ८०० मीटर- ०४ खेळाडू |

५) स्पर्धेदरम्यान पंचांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील. पंचांशी वाद घातल्यास संघास/खेळाडूस स्पर्धेतून बाद करण्यात येईल.

६) स्पर्धेतील प्रत्येक क्रीडाप्रकाराकरिता कमीत कमी चार संघ/खेळाडू असल्याशिवाय सदरची स्पर्धा घेण्यात येणार नाही.

७) स्पर्धेतील सर्व सामने हे बाद पध्दतीने खेळविण्यात येतील.

८) खेळासंदर्भात कुठल्याही तक्रारीबाबत संयोजन समितीचा निर्णय अंतिम राहील.

९) सर्व खेळानुरुप ड्रेसकोड अभिप्रेत आहेत. बॅडमिंटनसाठी बॅडमिंटन शूज अनिवार्य आहेत.

१०) ज्या खेळासाठी बॅट व रॅकेटची आवश्यकता असेल ती संबंधीत सहभागी खेळाडूंनी स्वत: आणावयाच्या आहेत.

११) खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होण्याकरीता कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता अथवा मानधन देय राहणार नाही.

१२) सर्व संघांनी व खेळाडूंनी खेळाच्या नियमांचे व शिस्तीचे पालन करावे.

१३) सर्व खेळाडूंनी स्वत:चे ओळखपत्र स्पर्धा दरम्यान धारण करणे अनिवार्य आहे.

१४) क्रिकेट स्पर्धा ०८ षटकांची टेनिस बॉल वर खेळवण्यात येईल व अंतिम सामना १० षटकांचा असेल.

१५) एका गोलंदाजास जास्तीत जास्त २ षटके टाकता येतील.

१६) खेळासंदर्भात कुठल्याही तक्रारीबाबत मा. सहसंचालक यांचा निर्णय अंतिम राहील.

**(क्रीडास्पर्धेविषयी अधिक माहितीकरीता gceksport22@gmail.comया ईमेल आयडीवर मेलद्वारे तसेच श्री. राजेश गायकवाड मो.नं. ९१७५२०८२३३, श्री.राहूल जाधव मो.नं. ९६७३३३५७१२ व श्री.राम तांबडे मो.नं. ८८०५४९८९२९ या क्रीडा समिती सदस्यांच्या मोबाईल नंबरवर कॉल व व्हॉट्अॅपद्वारे संपर्क करावा.)**

या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय संस्थाप्रमुखांना सूचित करण्यात येते की, वर नमूद केलेल्या क्रीडा प्रकारात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सर्व अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची नावे नोंदवून सहभागी होण्याबाबत आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात. **सदर खेळात/संघात सहभागी होणाऱ्या अधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची नावे या परित्रकासोबत दिलेल्या गुगल फॉर्मद्वारे (https://forms.gle/PYvBAiBZdZXVND1h8) बुधवार दिनांक ११.०१.२०२३ रोजीपर्यंत विनाविलंब सादर करण्यात यावीत.**

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत: प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.